ISBN NO: 978-93-83619-15-3



ONE DAY NATIONAL SEMINAR ON

# INDO-PAK RELATIONS : HISTORICAL & POLITICAL PERSPECTIVES

December- 22, 2018

## SEMINAR PROCEEDINGS

Editors
Prof. Anant A. Rindhe
Dr. Sandip B. Kale

Organized by

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE & DEPARTMENT OF HISTORY

YESHWANT MAHAVIDYALAYA, SELOO

NAAC Reaccredited by B Grade

| Ph. 07155-220227 | Email : principal_seloo@yahoo.com | Website : ymseloo.edu.in

## CONTENTS : VOL -II


| Sr. No | Tttle | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1. | Wailing Valley - Human Rights issues in Kashmir and Indo-Pak relations | Rashmi Condra | 1 |
| 2. | India-Pakistan Relations (1947-1975) With Respect To Cold War - A Brief Study | Ms. Mrunalini P. Thombre | 4 |
| 3. | Partition of India and Views of Mahatma Gandhi | Dr. Abha A. Tiwari-Dwivedi | 7 |
| 4. | Indo –Pak Relation Growth Terrorism and Status of Kashmir Dispute | Dr. Anjali Andrew | 9 |
| 5. | Indo-Pak Relation. Kashmir Conflict | Dr. Aneeta Sen<br>Vikash Verma | 12 |
| 6. | भारताची फाळणी आणि महात्मा गांधी | डॉ. वीरेंद्र बैस | 15 |
| 7. | भारत – पाकिस्तानसंघर्षाचा भौगोलिक दृष्टीकोन | प्रा. बुद्धघोष मधुकरराव लोहकरे | 17 |
| 8. | भारताचे परराश्ट्र धोरण आणि पाकीस्तान (१९४७–१९९०) | प्रा. अंबादास ओंकार बाकरे | 20 |
| 9. | काश्मीरच्या संदर्भात : कलम–३७० व भारतीय संविधान | प्रा. डॉ. सुनील एस. बोरकर | 23 |
| 10. | दहशतवाद आणि भारत–पाक संबंध | प्रा. डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे | 26 |
| 11. | दहशतवाद आणि भारत–पाक संबंध | प्रा.डॉ.सतीश रा.महल्ले | 28 |
| 12. | भारताची फाळणी आणि महात्मा गांधी | प्रा.डॉ. गजानन नत्युजी कळंबे | 31 |
| 13. | काश्मीर प्रश्न आणि पंडित जवाहरलाल नेहरु | प्रा. डॉ. रफीक शेख | 33 |
| 14. | भारताच्या फाळणीत मुस्लीम लीगची भूमिका | डॉ. नरेश डी. कवाडे | 36 |
| 15. | १९७१ च्या भारत – पाक युद्धाचे महत्व | प्रा. संजय उत्तमराव उगेमुगे | 42 |
| 16. | भारत–पाक १९६५ चे युद्ध : ताश्कंद करार | विनोद रा. कामडी | 44 |
| 17. | शीतयुध्दकालीन भारत – पाक संबंध | डॉ. राजेंद्र यादोराव खंडाईत | 46 |

ISBN NO: 978-93-83619-15-3

# काश्मीरच्या संदर्भात : कलम–३७० व भारतीय संविधान

**प्रा. डॉ. सुनील एस. बोरकर**
इतिहास विभाग प्रमुख, श्रीमती राजकमल बाबुराव तिडके महाविद्यालय मौदा, जि. नागपूर
मो. नं. ९४२२८२५५७९, म्.डपस रू नदपसइवतां५६६० / हउंपसण्बवउ

**प्रास्ताविक :–**

भारतीय राज्यघटनेत कलम ३७० हे अतिशय महत्वाचे आहे. कारण या कलमामुळेच जम्मु व काश्मीर राज्याला भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत विशेष अधिकार प्राप्त झालेले आहेत. म्हणूनच काश्मीर ला भारताचे "अविभाज्य अंग"मानले जाते. परंतु या विशेष अंगाला ज्या जखमा झालेल्या आहेत, असे म्हणण्यापेक्षा फुटीरतावादी व दहशतवाद रुपी जो कॅंसर झालेला आहे त्यावर वेळीच शस्त्रक्रीया करुन त्याला काढुन टाकणे आवश्यक आहे. अन्यथा तो भाग संपुर्ण देशरुपी शरीर सडविल्याशिवाय राहणार नाही.

काश्मीर हे उत्तर भारतातील एक महत्वपुर्ण राज्य आहे व ते निसर्ग सौंदर्याने नटलेले असून हिमालयाच्या कुशीत विसावलेले पृथ्वीवरील नंदनवन आहे. काश्मीरच्या दक्षिणेकडे हिमाचल प्रदेश व पंजाब च्या सिमा लागून आहेत तर उत्तर व पुर्वेकडे चीन ची सीमा लागून आहे. पाकव्याप्त (पि.ओ.के.) काश्मीर ला लागून जी प्रत्यक्ष नियंत्रण रेषा आहे, ती आणि गिलगिट–बाल्टीस्तान हे प्रदेश काश्मीरला पाकीस्तान पासून वेगळे करतात.

भारतीय संविधानातील कलम–३७० मुळे काश्मीरला विशेष दर्जा दिला गेला आहे. भारतातील हे एकमेव राज्य आहे, ज्या राज्यातील विधानसभेची कालमर्यादा ही सहा वर्षाची असून या राज्याला स्वत:चा ध्वज ही आहे. या शिवाय या राज्याला दोन राजधान्या आहेत. श्रीनगर ही उन्हाळी राजधानी तर जम्मु ही हिवाळी राजधानी आहे.

**काश्मीर समस्या कशी निर्माण झाली ?**

भारताच्या फाळणीच्या वेळेपासूनच भारत आणि पाकिस्तानचे संबंध ताणलेलेच होते. पाकिस्तानचे जनक महंमद अली जीना यांना माउंट बॅटन योजना ही पुर्णत: मान्य नव्हती. तर दुसरीकडे भारताचे स्वप्न भंग पावल्यामुळे पं. नेहरु, सरदार पटेल व गांधीजी ही नाराज होते. परंतु एकंदरीत परिस्थिती पाहता फाळणीशिवाय पर्याय नसल्याने, तसेच पाकिस्तान बरोबरचे संबंध सुधागवे या हेतुने नेहरुंनी उदार धोरण स्विकारले आणि फाळणीला मान्यता दिली.

परंतु लवकरच म्हणजे १५ ऑगष्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला आणि २२ ऑगष्ट १९४७ रोजी पाकिस्तानच्या चिथावणीवरुन व्यायव्य सरहद्दीवरील पठाण टोळ्यांनी व पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांनी काश्मीरवर (श्रीनगरवर) हल्ले सुरु केले. हे परतवून लावण्यासाठी काश्मीरची लष्करी ताकद कमी पडु लागल्यामुळे काश्मीरचे महाराजा हरिसिंहानी २४ आक्टोबरला भारत सरकार कडे लष्करी मदतीची मागणी केली. त्या करीता महाराजा हरिसिंहाने जम्मु व काश्मीरचे प्रधानमंत्री मेहरचंद महाराजांना दिल्लीला पाठविले. परंतु गव्हर्नर जनरल माउंट बॅटनच्या सांगण्यावरुन नेहरुंनी हरिसिंहाला कळविले की, आं. रा. कायद्यानुसार काश्मीरचे भारतात विलिनिकरण झाल्याशिवाय मदत देता येणार नाही. तेव्हा २६ आक्टोबरला हरिसिंहाने "सामिलीनाम्यावर" सही केली आणि नेहरुंच्या सल्ल्याने राज्याचे प्रधानमंत्री म्हणून शेख अब्दुल्ला ह्यांची नियुक्ती केली.

काश्मीर मधील एकुन गंभीर लष्करी स्थिती लक्षात घेवून हल्लेखोरांना पिटाळुन लावण्यासाठी भारतीय लष्करासह एकुण १०० विमानांनी श्रीनगरकडे कूच केली. आणि पाकिस्तानी हल्लेखोरांना काश्मीरमधुन पिटाळुन लावण्यात आले. मात्र काश्मीरचा पश्चिमेकडील प्रदेश अजुनही पाकिस्तानच्याच ताब्यात होता. दोन्ही देशात युध्द होण्याच्या भितीने माउंटबॅटनच्या सल्ल्याने नेहरुंनी हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षापरिषदेकडे पाठविला. इंग्लंड व अमेरिकेच्या दबावाखालील सुरक्षा परिषदेने ह्या प्रश्नाला "भारत–पाकिस्तान विवादाचे" स्वरुप दिले. आणि नियंत्रण रेषेजवळ (L.O.C.) युध्द बंदी करण्याची सुचना केली. त्यानुसार ३१ डिसेंबर १९४८ रोजी दोन्ही देशांनी युध्दबंदीला मान्यता दिली.

काश्मीरच्या सामिलीकरणाच्या निर्णयावर तेथे सार्वमत घेण्याचा प्रस्ताव यु.नो.ने. ऑगष्ट १९४८ मध्ये मंजूर केला. मात्र त्याकरीता दोन पुर्व अटी होत्या :–

१) काश्मीरमधुन पाकिस्तानी फौजा काढुन घ्याव्या.

२) संपुर्ण राज्यात श्रीनगर प्रशासनाची सत्ता कायम ठेवावी.

मात्र पाकिस्तानने या अटी मान्य केल्याच नाही. त्यामुळे काश्मीरमध्ये सार्वमत घेता आले नाही. नेहरुंनी सार्वमताचे समर्थन केल्यामुळे टिकाकारांनी त्यांच्या 'आदर्श उदार मतवादावर' टिका केली. एवढे मात्र खरे की, नेहरुंच्या राष्ट्रसंघाकडे धाव घेण्यामुळे व काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याच्या घोषणेमुळे काश्मीर प्रश्न हा आं.रा. गुंतागुंतीचा बनला. नेहरुनंतर १९६५, १९७१ व १९९९ चे

ISBN NO: 978-93-83619-15-3

कारगिल युध्द ह्या मुळे या प्रश्नात अधिकच भर पडली. सध्याच्या परिस्थितीत पाकिस्तान नियंत्रण रेषे पलिकडील दहशतवादी संघटनांना आर्थिक व लष्करी मदत देऊन भारताविरुध्द एक प्रकारचे अघोषित युध्दच सुरु ठेवले आहे.

**कलम ३७० :–**

२६ जानेवारी १९५० रोजी भारतिय घटनेची अंमलबजावणी होवून जम्मु व काश्मीर भारताचे अविभाज्य अंग बनले आणि काश्मीरवर भारताचा घटनात्मक अधिकार लागू झाला व त्यानुसार काश्मीरला कलम–३७० द्वारे विशेष दर्जा देण्यात आला. परंतु सध्या जम्मु–काश्मीर बाबत लागू असलेल्या घटनेच्या कलम–३७० वरुन संपुर्ण भारतात राजकिय नेते, विविध पक्ष आणि जनतेमध्ये वादंग निमार्ण झालेला आहे. एकुणच कलम –३७० हे भारताच्या एकता व अखंडतेच्या दृष्टीने वादग्रस्त ठरले आहे.

कलम–३७० नुसार १७ नोव्हेंबर १९५६ रोजी काश्मीरची राज्यघटना अस्तित्वात आली. या घटनेतील कलम १(२) नुसार २६ जानेवारी १९५७ रोजी संपुर्ण जम्मु–काश्मीर राज्यात घटनेची अंमलबजावणी सुरु झाली. घटनेत एकुण १३ भाग व १४७ कलमे आहेत. त्यापैकी काही खालीलप्रमाणे आहेत.

**तरतुदी:–**

- कलम–३७० मुळे जम्मु–काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा मिळाल्याने हे राज्य स्वायत्त असलेले राज्य आहे.
- ३७० कलमान्वये जम्मु–काश्मीरसाठी फक्त संरक्षण, विदेश व दळण–वळणाशी संबंधितच कायदे करण्याचा अधिकार केंद्राला आहे.
- इतर कायदे लागू करावयाचे असल्यास राज्यसरकारची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- विशेष अधिकारामुळे भारताच्या राष्ट्रपतीला जम्मु–काश्मीरची घटना बरखास्त करण्याचा अधिकार नाही.
- जम्मु–काश्मीरचा रहिवासी नसलेली व्यक्ती येथे जमीन खरेदी करु शकत नाही.
- येथिल महिलेने इतर राज्यातील मुलाशी लग्न केले असेल तर त्यालाही तेथे जमीन खरेदी करण्याचा अधिकार नाही.
- भारतात आणीबाणी लावण्याची तरतुद असलेले कलम–३६० हे जम्मु–काश्मीरला लागू पडत नाही.
- भारतातील सर्व राज्यात लागू होणारे कायदे सुध्दा या राज्यात लागू होत नाही.
- जम्मु–काश्मीर विधानसभेचा कार्यकाळ ६ वर्षाचा आहे. तर इतर राज्यात तो ५ वर्षाचा आहे.
- जम्मु–काश्मीरला स्वतःचा ध्वज आहे. इतरांना नाही.
- जम्मु–काश्मीरच्या नागरीकाला दुहेरी नागरीकत्व आहे.
- भारताच्या उच्च न्यायालयाचे आदेश जम्मु–काश्मीरला लागू होत नाही.
- येथिल महीलांसाठी शरियत कायदा लागू आहे.
- येथे अल्पसंख्याकांना आरक्षण नाही.

वरील सर्व बाबींमुळे भारतात जनतेतर्फे, आणि विविध राजकिय पक्षांद्वारे घटनेच्या कलम–३७० च्या अस्तित्वावर प्रश्न चिन्ह निर्माण केले जात आहेत. संपुर्ण भारतासाठी एकच राज्यघटना असावी,'एक राष्ट्र एक संविधान' असल्याशिवाय अखंड भारताची कल्पना अशक्य आहे असे अनेकांना वाटते.

**कलम–३७० च्या समर्थनार्थ केले जाणारे तर्क:–**

- कलम–३७० कायम राहील्यास जम्मु–काश्मीरच्या लोकांना स्वतःच्या गरजेनुसार कायदा करता येऊ शकतो.
- जम्मु–काश्मीरचे माजी मुख्यामंत्री उमर अब्दुल्लाच्या मते कलम–३७० ची चूकीची व्याख्या केली गेलेली आहे.
- कलम–३७० नुसार केवळ राज्यातील तरुणांनांच नोकरी मिळविण्याचा अधिकार असल्याने तरुणांसाठी नोकरीच्या संधी सुरक्षितआहेत.

**कलम–३७० च्या विरोधार्थ केले जाणारे तर्क:–**

- कलम–३७० मुळे जम्मु–काश्मीर मधील दहशतवाद अधिकच वाढत चाललेला आहे. कारण या कलमांतर्गत पाकिस्तानी नागरीक काश्मीरी महिलेशी विवाह करुन येथील नागरीकत्व स्विकारु शकतो.
- जम्मु–काश्मीर मध्ये कलम–३७० नुसार माहितीचा व शिक्षणाचा अधिकार कायदा लागू होत नाही. त्यामुळे येथील जनता या अधिकाराचा लाभ घेवू शकत नाही.
- या कलमामुळे अल्पसंख्यांकांच्या हिताकडे दुर्लक्ष होत आहे.

ISBN NO: 978-93-83619-15-3

**निष्कर्ष :–**

- काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असून येथिल जनता ही भारताची नागरीक आहे. कलम–३७० मुळे काश्मीरला मिळालेल्या विशेष अधिकारामुळे तेथे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. सध्यास्थितीत काश्मीरी जनता ही दहशतीच्या वातावरणात जगत आहे.दहशतवादी सरकारी ईमारती, शाळा यांची जाळपोळ करीत आहेत. भारतीय सैनिकांचे दररोज रक्त सांडत आहे. त्यांचे अपहरण करुन ठार मारले जाते. त्यांच्या मृत शरीराची विटंबना केली जाते.
- आपल्या सैनिकांना काश्मीरी तरुण व तरुणी दगड मारतात, लाथा व बुक्क्यांचा मार देतात. सैनिकांकडे A.K.47 बंदुका असुनही ते प्रतिकार न करता सर्व निमुटपणे सहन करतात. ही विदारक परिस्थिती स्वाभिमानी व देशभक्त भारतीयांना पाहवली जात नाही. आपल्या सैनिकांचे हात कायद्याच्या चौकटीत बांधून ठेवले असल्यामुळेत्याचा फायदा देशद्रोही व फुटिरतावादी नेते घेत आहेत. हे लोक सर्रास भारताविरोधात व पाकिस्तान समर्थनार्थ बोलत असतात.
- फाळणीच्या वेळेसची स्फोटक परिस्थिती लक्षात घेऊन व त्या वेळेसची आवश्यकता पाहता कलम–३७० आवश्यक होते. परंतु सध्याच्या परिस्थितीत कलम–३७० ची गरज आहे काय? असा प्रश्न निर्माण होतो. भारत सरकार काश्मीरसाठी दरवर्षी अंदाजपत्रकात मोठ्या रकमेची तरतुद करते आणि तेथिल नागरीकांवर प्रचंड पैसा खर्च करतो. त्या मोबदल्यात आपल्याला मात्र दहशतवाद व फुटिरतावाद पदरी पडतो. असे असुनही कलम–३७० रद्द का केले जात नाही हे एक कोडेच आहे. हे कलम भारताच्या 'अवघड जागेचे दुखणे' होवून बसलेले आहे.
- दुसरीकडे चिनने पाकिस्तानात आपले प्रचंड सैनिक आणुन ठेवले आहेत. P.O.K. मधिल काही भाग चिनला देण्यात आलेला आहे. तेथे चिनी सैनिक मुबलकपणे वावरत आहेत. हे भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने फारच धोकादायक आहे. पाकिस्तान हा दहशतवादी निर्माण करणारा कारखाना आहे.
- पाकिस्तानने दहशतवाद्यांना मदत करणे बंद न केल्यामुळे अमेरिका सारख्या जवळच्या मित्राने सुध्दा पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात दिली जाणारी आर्थिक मदत थांबविलेली आहे. त्यामुळे पाकिस्तानची आर्थिक स्थिती फार वाईट आहे. पाकिस्तानचे नवनिर्वाचित पंतप्रधान ईम्रानखान ने देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी पंतप्रधानाच्या ताफ्यातील अनेक महागड्या व आरामदायी गाड्यांचा लिलाव केला. तसेच सरकारी म्हशी सुध्दा विकल्या, एवढी दारुण अवस्था झालेली आहे. तर दुसरीकडे चिन, सौदी अरेबिया सारख्या राष्ट्रांकडे भिकेचा कटोरा घेवून फिरत आहे. परंतू तरीही पाकिस्तान भारतात दहशतवादी पाठविणे बंद करत नाही.
- वरीलप्रकारचे सर्व प्रकार सुरु असुनही भारत सरकार मात्र काश्मीर मधील देशद्रोही व फुटिरतावादी नेत्यांवर कडक कारवाई न करता त्यांना चुचकारत आहे. कलम–३७० च्या संरक्षणामुळेच वरील सर्व प्रकार होत असल्याचे यावरुन प्रकर्षाने जाणवते. तेव्हा कलम–३७० रद्द करुन तेथिल जनतेला लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणले पाहीजे व यासाठी काश्मीरी जनता व भारत सरकारने पुढाकार घेतला पाहीजे. तरच भारत वरील समस्येवर मात करु शकेल.

**संदर्भ–**


1. दिक्षीत ना. स
2. ी. –'आधुनिक भारताचा इतिहास' पिंपळापुरे प्रकाशन
3. वैद्य सुमन, कोठेकर शांता – आधुनिक भारताचा इतिहास
4. दिवाण डॉ. चंद्रशेखर -- भारताची विदेशनिर्ती, विद्या प्रकाशन नागपूर
5. ग्रोव्हर डॉ. बी.एल., बेल्हेकर डॉ. एन. के. – आधुनिक भारताचा इतिहास एस. चंद आणि कंपनी
6. वर्मा मदनलाल(२००६) – स्वाधिनता संग्राम के क्रांतीकारी साहीत्य का इतिहास, प्रविण प्रकाशन न्यु दिल्ली.
7. दैनिक तरुण भारत नागपूर ९ जुलै २०१७
8. https://hi.m.wikipedia.org>.wiki>


❖❖❖❖